# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,

**श्रीक्षेत्र पंढरपूर, जि.सोलापूर – ४१३३०४**

**(महाराष्ट्र शासन स्थापित)**




## गोशाळेतील गाईंसाठी देशी ज्वारीचा कडबा पुरवठा कामाचे जाहिर दरपत्रक

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | देशी ज्वारीचा कडबा. | **अंदाजित खरेदी** - १,२७,७५० **किलो** |
| २ | पुरवठा कामाचा कालावधी | एक वर्ष |
| ३ | अंदाजित खरेदी रक्कम | रू.९,००,०००/- |
| ४ | सुरक्षा अनामत रक्कम | रू.२७,०००/- |
| ५ | प्रपत्र किंमत (विना परतावा) | रू.३,०००/- जीएसटीसह |

## सन २०२१-२२

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि.सोलापूर - ४१३३०४**
**क्र. गोशाळा विभाग/का.वि./०३/२०२१ (सन २०२२)**

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे गोशाळा विभागासाठी देशी ज्वारीचा कडबा पुरवठा कामाचे दरपत्रक सिलबंद लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.**

१) सदर पुरवठा कामाच्या माहितीचे बुकलेट कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच मंदिर समितीच्या www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावर मिळतील. दरपत्रक फॉर्म व त्यासोबतची सर्व कागदपत्रे स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून दि.----/-----/२०२१ पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक देशी ज्वारीचा कडबा पुरवठा करणेकामी भरलेले आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष श्री.संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

**२) सदरबाबत अधिक माहितीसाठी संपर्क नाव व क्रमांक :-**
**श्री.मोहन चंद्रकांत औसेकर, लिपीक मो.९९२२५३१८००.**
**श्री.अतुल रघूनाथ बक्षी, विभाग प्रमुख मो. ९४०३२९३२०८.**

३) वरील पुरवठा कालावधीत सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास, बदल होवू शकतो व त्याचे अधिकार, कार्यकारी अधिकारी, मंदिर समिती यांनी राखून ठेवलेले आहेत.

४) पुरवठाधारकांनी तांत्रिक लिफाप्यामध्ये दिलेल्या दस्तऐवजाच्या मूळ प्रती मंदिर समितीने मागणी केल्यास सादर करणे बंधनकारक राहील.

५) कोणतेही दरपत्रक अगर सर्वच दरपत्रके कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिरे समितीने राखून ठेवलेले आहेत.

६) पुरवठाधारकांच्या कोणत्याही शर्ती व अटी मंदिर समितीवर बंधनकारक असणार नाहीत.

७) मंजुर पुरवठाधारकास मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत करणे बंधनकारक आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५% पर्यंत दंड आकारण्यात येईल.

८) मालाचा पुरवठा मागणीप्रमाणे न आलेस अथवा योग्य प्रतीचा/गुणवत्तेचा नसल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास मंदिर समितीची अडचण होऊ नये म्हणून व्दितीय, तृतीय न्युनतम पुरवठाधारकांकडून अगर इतर पुरवठाधारकांकडून बाजार भावाने आवश्यकतेनुसार लाडूप्रसाद खरेदी करण्यात येऊन त्यासाठी जादा लागलेल्या फरकाची रक्कम पुरवठाधारकाच्या बिलातून अथवा सुरक्षा अनामत रकमेतून वसुल करणेत येईल.

९) देशी ज्वारीचा कडबा पुरवठा कालावधी कार्यारंभ आदेश दिल्यापासून एक वर्षाचा राहील. तथापि, पुरवठा कालावधीत सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास, बदल होवू शकतो व त्याचे अधिकार, कार्यकारी अधिकारी, मंदिर समिती यांनी राखून ठेवलेले आहेत.

१०) पुरवठाधारकांनी दरपत्रकासोबत जोडलेल्या दस्तऐवजाच्या मूळ प्रती मंदिर समितीने मागणी केल्यास सादर करणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

११) मंजूर झालेल्या दराने व मागणी प्रमाणे देशी ज्वारीचा कडबा पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाव वाढ दिली जाणार नाही व मागता येणार नाही. पुरवठाधारकाने देशी ज्वारीचा कडबा पुरवठा करावयाचे नाकारल्यास त्याची पुरवठा न केलेल्या मालाची सुरक्षा अनामत रक्कम समिती खाती जमा करणेत येईल.

१२) पुरवठा करावयाच्या देशी ज्वारीचा कडब्याची अंदाजित मागणी येणा-या भाविकांची संख्या कमी / जास्त झाल्यामुळे मागणी देखील कमी व जास्त होऊ शकते.

१३) मंदिर समिती आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त ठेकेदाराला कार्यादेश देऊ शकते.

१४) मंदिर समितीस आवश्यकता वाटल्यास मंजुर पुरवठाधारकास १२ महिनेपर्यंत मुदतवाढ दिल्यास मंजुर दरात काम करण्याची जबाबदारी मंजुर पुरवठाधारकाची राहील. तथापि पुरवठाधारकास हक्क सांगता येणार नाही.

१५) पुरवठा कालावधीमध्ये शासकीय कार्यालयाकडुन कर, उपकर, जकात यांचे दरामध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत समिती व्यवस्थापनाकडे मागणी करता येणार नाही.

१६) पुरवठाधारकाने मालाचा पुरवठा मध्येच बंद केल्यास व त्यामुळे सदर बाबतीत फेर प्रक्रिया करुन मालाची खरेदी करावी लागल्यास जाहिरात खर्च व प्रक्रियेचा इतर येणारा सर्व समावेशक खर्च मिळून येणारी रक्कम नुकसान भरपाई म्हणून पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

१७) पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती / नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रनाबाहेर असेल उदा. आग, महापूर, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व त्यामुळे पुरवठाधारकाचे नुकसान झाल्यास, त्यासाठी मंदिर समिती व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

१८) देशी ज्वारीचा कडबा खराब असल्याचे आढळून आलेस जेवढा खराब असेल तेवढा बदलून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१९) देशी ज्वारीचा कडबा चांगल्या गुणवत्तेचा असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भेसळ असता कामा नये.

२०) पुरवठादाराने मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या प्रमाणामध्ये चांगल्या प्रतिचा व गुणवत्तेचा देशी ज्वारीचा कडबा पुरवठा करावयाचा आहे. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत, प्रमाण, गुणवत्ता संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

२१) दरपत्रकामध्ये देशी ज्वारीचा कडब्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. माल पोहचविण्याचा वाहतुक खर्च, गंज लावणे, हमाली, पॅकींग अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

२२) सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २% आयकर व जीएसटी टिडीएस कपात केली जाईल. पुरवठा कामाची देयके मासिक/एकरकमी अदा करण्यात येतील.

२३) सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

२४) देशी ज्वारीचा कडबा पुरवठा करून गंज लावणेचे ठिकाण गोशाळा, यमाई तलाव, पंढरपूर, जि.सोलापूर राहील.

२५) देशी ज्वारीचा कडबा वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

२६) पुरवठाधारकास देशी ज्वारीचा कडबा पुरवठा मध्येच थांबवता येणार नाही. जर असे झाल्यास अनामत रक्कम जप्त करून त्याचे नाव काळया यादीत टाकले जाईल.

२७) पुरवठाधारकाने पुरवठा केलेल्या देशी ज्वारीचा कडब्यामधून जनावरांस विषबाधा अथवा अन्य काही शारिरीक त्रास झाल्यास पुरवठाधारकांवर जबाबदारी निश्चित करून, त्यांचेवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल. तसेच ज्या जनावरास विषबाधा होईल, त्याचा वैद्यकीय उपचार खर्च व इतर अनुषंगीक खर्च देण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील. त्यासाठी मंदिर समिती आर्थिक सहाय्य करणार नाही.

२८) पुरवठाधारकाने उच्च् प्रतीचा /चांगल्या दर्जाचा व गुणवत्तेचा देशी ज्वारीचा कडबा पुरवठा न केल्यास, पुरवठा कामाचे बिल अदा केले जाणार नाही. तसेच पुरवठाधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. दंडाची रक्कम ठरविण्याचे अधिकार मंदिर समितीस राहील.

२९) दरपत्रकात नमुद केलेल्या कामासाठी पुरवठाधारकाने दुस-या पुरवठाधारकास काम दिल्याचे आढळल्यास पुरवठाधारकाची मंजुर ई दरपत्रक रद्द करून, त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

३०) पुरवठा कामाचे देयक सादर करताना देयकामध्ये आदेशातील वर्णनाप्रमाणेच संपूर्ण तपशिल असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये. देयक छापील स्वरूपात असावे. त्यामध्ये बिल क्रमांक, दिनांक, मालाचे वर्णन, दर, जीएसटी, सही, शिक्का व इतर अनुषंगीक बाबींचा समावेश असावा.

३१) यासोबत दिलेल्या नमुन्यात दर नमुद करावेत. दर अंकी व अक्षरी स्पष्ट करणे आवश्यक आहे. दर नमुद करतांना खाडाखोड करू नये. अंकी व अक्षरी दरांमध्ये तफावत असल्यास कमी असलेला दर गृहीत धरण्यात येईल.

३२) सदर कामाच्या अटी व शर्तीबाबत कोणत्याही पुरवठाधारकास न्यायालयात दाद मागता येणार नाही.

३३) दरपत्रक ज्या फर्मच्या / व्यक्तीच्या नावाने असेल त्याच नावाने इतर सर्व कागदपत्रे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भिन्नता आढळल्यास सदर दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही. सदर दरपत्रक अनाधिकृत समजून अपात्र ठविण्यात येईल. त्याबद्दल पुरवठाधारकास तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही.

३४) पुरवठाधारक देशी ज्वारीचा कडबा पुरवठा ठरलेल्या वेळेत करत नसेल, कामात चालढकल करत असेल, अथवा समाधानकारक काम करत नसेल तर समिती कोणतीही पुर्व सूचना न देता कॉन्ट्रॅक्ट रद्द करेल व पुरवठाधारकांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

३५) मंजूर पुरवठाधारकास सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा स्वतंत्र करारनामा मंदिर समिती बरोबर करणे बंधनकारक राहील.

३६) कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या सर्व नियमांची खबरदारी घ्यावी.

३७) देशी ज्वारीच्या कडब्याचे वजन प्रती पेंडी किमान १ ते १.५ किलो असावे. वजनामध्ये तफावत आढळल्यास देयक अदा केले जाणार नाही.

३८) ज्यांचे दरपत्रक मान्य होईल, त्या पुरवठाधारकाने सुरक्षा अनामत रक्कम दरपत्रक मंजुर झाल्यानंतर तात्काळ मंदिर समितीकडे भरणा करणे आवश्यक आहे. सदर सुरक्षा अनामत म्हणुन एक वर्षासाठी किंवा मंजुर दरपत्रकास मुदतवाढ दिल्यास त्या मुदतीपर्यंत समितीकडे जमा केली पाहिजे. दरपत्रकात नमुद केलेल्या कामाबद्दल कोणतीही तक्रार नसेल तर कामाचा कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाईल. सुरक्षा अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

३९) सदर दरपत्रकाची फॉर्म फी विना परतावा आहे, फॉर्म फी कोणत्याही परिस्थितीत पुरवठाधारकास परत मिळणार नाही.

४०) सुरक्षा अनामत रक्कम कंत्राटदाराचे काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्यानंतर व करारनाम्याची मुदत संपल्यावर परत करण्यांत येईल.

४१) मंजुर पुरवठाधारक हा मंदिर समितीला देशी ज्वारीचा कडबा समाधानकारकरित्या व मंदिराच्या मागणी प्रमाणे पुरवठा करण्यास सक्षम नसल्याचे आढळून आल्यास, कोणतेही कारण न देता पुरवठाधारकाशी केलेला करार रद्द करण्यांत येईल व त्याने भरलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.

४२) कमी जास्त दराचे दरपत्रक स्वीकारण्याचा, नाकारण्याचा अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे मंदिर समितीवर बंधनकारक राहणार नाही.

४३) कार्यादेश प्रमाणे काम करत असलेल्या कामाचे केव्हाही परीक्षण, पर्यवेक्षण करण्याची मंदिरे समितीला पूर्ण अधिकार राहील.

४४) पुरवठा करावयाचा देशी ज्वारीचा कडबा हा वाळलेला असणे आवश्यक आहे. जर तो ओला अथवा पाणी मारलेले आढळल्यास पुरवठाधारकाचा सर्व कडबा नाकारला जाईल व त्यासाठी मंदिर समिती होणा-या नुकसानीस जबाबदार राहणार नाही.

४५) पुरवठा करावयाच्या देशी ज्वारीच्या कडब्याचे वजन इलेक्ट्रॉनिक वजन काट्यावर करून त्यानुसार बिल अदा केले जाईल. सदर वजनाचा खर्च पुरवठाधारकांने स्वतः करावयाचा आहे.

४६) देशी कडबा पुरवठा करून मंदिर समितीने नेमून दिलेल्या जागेत पुरवठाधारकाने स्वखर्चाने: गंज लावून देणे आवश्यक आहे.

४७) ज्या वाहनातून देशी ज्वारीचा कडबा पुरवठा करण्यात येईल, त्या वाहनाचा माल भरून व रिकामा करून मंदिर समितीने निश्चित केलेल्या वजनकाट्यावर मंदिर समितीच्या कर्मचा-यां समक्ष वजन करून त्याची वजन पावती देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

४८) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर ७ दिवसांचे आत करारनामा करुन देण्यासाठी रु.१००/- चा गैरन्यायीक स्टॅम्पपेपर जमा करावा, परंतू अशाप्रकारे करारनामा करुन दिला नाही, अथवा त्याबद्दल टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करणेत येईल.

४९) सदरचे दरपत्रक कार्यादेश नसुन फक्त बीड ऑफ कोटेशन मागविण्यासाठी आहे.

५०) मंदिर समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

५१) सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

५२) प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

५३) **दरपत्रकासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे**. सदरची सर्व कागदपत्रे दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक पानावर पुरवठाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा. या आवश्यक कागदपत्रांमध्ये काही त्रुटी असल्यास किंवा कागदपत्रे सादर न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

| **अ.क्र.** | **आवश्यक कागदपत्रांची यादी.** |
|---|---|
| १ | फॉर्म फी (विना परतावा) मंदिर समितीच्या खात्यात RTGS/NEFT/ Internet Banking द्वारे किंवा रोखीने जमा केलेली पावती.<br>ICICI Pandharpur Branch Account No :- 647105005981 IFSC Code :- ICIC0006471 |
| २ | परिशिष्ट - १ प्रमाणे पुरवठाधारकाची माहिती. |
| ३ | रहिवाशी पुरावा (आधारकार्ड/ रेशनकार्ड/मतदान ओळखपत्र) |
| ४ | पुरवठाधारकाच्या नावाचा गाव नमुना ७/१२ व ८ अ. |
| ५ | पॅन कार्ड. |
| ६ | शासकीय /निमशासकीय /खाजगी संस्थाकडे देशी ज्वारीचा कडबा पुरवठा केलेल्या कामाची अनुभव प्रमाणपत्रे. |
| ७ | परिशिष्ट - २ प्रमाणे प्रतिज्ञापत्र (नोटरी). |

# पुरवठाधारकांची माहिती

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | फर्मचे नाव | |
| | पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता | |
| | दुरध्वनी क्रमांक | |
| | ई मेल :- | |
| | व्हाटसअप् क्रमांक | |
| २ | निविदेसंबंधी चर्चा करणेसाठी अधिकृत व्यक्तीचे नाव :- | |
| | मोबाईल क्रमांक :- | |
| ३ | भागीदारांची नावे | |
| ४ | संस्थेचा बँक तपशिल (रद्द केलेल्या धनादेशाची छायांकित प्रत सोबत जोडावी) | |

स्थळ:-

दिनांक:- नांव, शिक्का व स्वाक्षरी

परिशिष्ट क्रमांक - २

**रू.१००/- च्या स्टॅपपेपरवरील प्रतिज्ञापत्र (नोटरी)**

**प्रति,**

**मा.कार्यकारी अधिकारी,**
**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,**
**पंढरपूर, जि.सोलापूर - ४१३३०४.**

**महोदय,**

**मी / आम्ही खाली सही करणार श्री./श्रीमती ------------------------------------------------------------ श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे देशी ज्वारीचा कडबा पुरवठा करण्यासाठी जाहिर दरपत्रकामधून श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या होणा-या दर मंजुरी आदेशान्वये अंतिम करण्यात येणा-या दराने पुरवठा करण्याची आमची / माझी तयारी आहे. दर स्विकृतीबाबत स्वाक्षरीत दरपत्रक सादर करत आहे / आहोत. तसेच या संमतीपत्राद्वारे मी / आम्ही घोषित करत आहे / आहोत की, सोबत सदरचे दर पुरवठयासाठी जाहिर दरपत्रकाचे सोबतच्या सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या आहेत. सदरच्या सर्व अटी व शर्ती आम्हांस मान्य असून त्या आमच्यावर बंधनकारक राहतील. जाहिर दरपत्रकामध्ये देण्यात आलेली माहिती व कागदपत्रे सत्य असून बरोबर आहे.**

**तसेच** संस्थान/शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्था यांनी मला /माझ्या संस्थेला/फर्मला काळया यादीमध्ये समाविष्ट केलेले नाही. त्याबाबत माझेकडून हयगय झालेस किंवा काळया यादीत माझे नाव असल्याचे निदर्शनास आल्यास मी / आम्ही दंडनीय व कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

**स्थळ:-**
**दिनांक:-** **पुरवठाधारकाचे नांव, शिक्का व स्वाक्षरी**

**परिशिष्ट क्रमांक - ३**

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर (महाराष्ट्र) ४१३३०४.**
**क्र. गोशाळा विभाग/का.वि./०२/२०२१ (सन २०२१-२०२२)**

**दरपत्रक**

**नांव व पत्ता :**-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित पायाभूत दर प्रती किलो (सर्वकरासहीत, गंज लावणे व पोहोच खर्चासह) | दर प्रती किलो (सर्वकरासहीत, गंज लावणे व पोहोच खर्चासह) | |
|---|---|---|---|---|
| | | | अंकी (रू.) | अक्षरी (रू.) |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ०१ | देशी ज्वारीचा कडबा. | रू.७.००/- | | |

**स्थळ:-**

**दिनांक:-** **नांव, शिक्का व स्वाक्षरी**